महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका.
जा.क्र.: मआ/प्रकल्प/१९२२
दिनांक: १६/०८/२०१९

-: कार्यालयीन परिपत्रक :-

विषय :- पुणे महानगरपालिका सायकल क्लबच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविणे.
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त ठ.क्र. ६/१७७ दि.२/७/२०१९.

पुणे महानगरपालिकेच्या सायकल विभागाच्या उपक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी /कर्मचा-यांनी सायकल क्लब स्थापन केला असून पुणे महानगरपालिकेच्या सायकल विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यासाठी स्वयंप्रेरणेने काम करण्याची तयारी दर्शविली असून त्यासाठी पुणे महानगरपालिका सायकल क्लबने प्रस्तावित केलेल्या उपक्रमांना मा.महापालिका आयुक्त यांनी मा.महापालिका आयुक्त ठ.क्र. ६/१७७ दि.२/७/२०१९ अन्वये मान्यता दिली आहे.

पुणे महानगरपालिका सायकल क्लब तसेच इतर स्वयंसेवी संस्था,नागरीक यांना या उपक्रमात सामिल करून घेऊन सायकल रॅलीच्या माध्यमातून स्वयंस्फूर्तीने पर्यावरण,ध्वनी प्रदुर्षण,आरोग्य,इ.विषयांबाबत मोठया प्रमाणात जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच इतर दिवशी व शासकीय सुटट्यांचे दिवशी पुणे शहरात व पुणे शहराबाहेर लघु पल्ल्याच्या व दिर्घ पल्ल्याच्या विविध संदेश घेऊन,लघुकालीन व दिर्घकालीन सायकल रॅलींचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच सायकलिंग संबंधीत विविध प्रशिक्षण, व्याख्याने, इ.चे आयोजन करण्यात येणार आहे, असे स्वयंनियोजनाने विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

पुणे महानगरपालिका सायकल क्लबमध्ये इच्छूक आजी ,माजी पदाधिकारी,अधिकारी,सेवकांना समाविष्ट करून घेण्यात येत आहे.

अशा स्वरूपाचा प्रकल्प राबविणारी पुणे महानगरपालिका ही भारतातील पहिली स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून नावलौकिकास येईल.ज्याप्रमाणे माहिती अधिकार खुले ग्रंथालय व माहिती अधिकार दिवस राबविणारी जशी पुणे महानगरपालिका भारतातील एकमेव महानगरपालिका म्हणून नावलौकिकास आली आहे.व महाराष्ट्र शासनाने देखिल याची दखल घेऊन शासनाच्या सर्व विभागात व अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पुणे मनपाच्या प्रकल्पाची अंमलबजावणी करणेबाबत आदेश पारित केले आहेत त्याप्रमाणे सायकल क्लब ही संकल्पना सुध्दा अन्य शासकीय विभागासाठी एक आदर्श पथदर्शी कल्पना म्हणून वाखाणली जाऊ शकते.

Scanned by CamScanner

उपरोक्त उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी होणेकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही संबंधित विभागांनी करावयाची असून पुणे महानगरपालिका सायकल क्लबला संपूर्ण सहकार्य करावयाचे आहे.

अ.क्र.	पुणे महानगरपालिका सायकल क्लबच्या उपक्रमात स्वयंसेवी संस्था व नागरीक स्वयंप्रेरणेने सामिल होत आहेत.सदर उपक्रमासाठी आवश्यक असणा-या खालील बाबी पुरविणे आहेत.	संबंधित विभागाने करावयाची कार्यवाही	संबंधित विभाग
१	वैदयकिय सुविधा पुरविणे.	पुणे महानगरपालिका सायकल क्लबच्या विविध उपक्रमांसाठी पुणे महानगरपालिका सायकल विभागाच्या मागणीप्रमाणे ॲब्युलन्स (वैदयकिय पथकासह) उपलब्ध करून देणे.तसेचआवश्यकतेप्रमाणे प्रथोमोपचार किट पुरविणे.	आरोग्य अधिकारी कार्यालय
२	वाहन व्यवस्था पुरविणे	पुणे महानगरपालिका सायकल क्लबच्या विविध उपक्रमांसाठी पुणे महानगरपालिका सायकल विभागाच्या मागणीप्रमाणे वाहन उपलब्ध करून दयावयाची आहेत.	मोटार वाहन विभाग
३	पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्यांच्या योजना/ माहिती इ.चा सायकल रॅलीच्या माध्यमातून प्रसार व प्रचार करणे व रॅलीसाठी आवश्यक असणारे पुणे महानगरपालिकेच्या विविध योजनांचे लघुसंदेश / माहितीफलक / पोस्टर्स/ बॅनर्स / इ. पुरविणे.	पुणे महानगरपालिका सायकल विभागाच्या समन्वयाने प्रचारासाठी आवश्यक असणारे आकार, संख्या,निश्चित करून घेऊन, संबंधित खात्यांमार्फत वेळोवेळी पुणे महानगरपालिका सायकल विभागाला उपलब्ध करून देणे.	सर्व खातेप्रमुख
४	रॅलीसाठी आवश्यक विविध प्रकारचे प्रचार साहित्य टिशर्टस,टोप्या, झेंडे, इ. अनुषंगिक क्रीडा साहित्य	पुणे महानगरपालिका सायकल विभागाच्या समन्वयाने हयासाठी आवश्यक असणारे आकार,संख्या, निश्चित करून घेऊन आवश्यकतेप्रमाणे साहित्य उपलब्ध करून देणे	उप आयुक्त (क्रीडा)

Scanned by CamScanner

	उपलब्ध करून देणे.		
५	ऑन लाईन रजिस्ट्रेशन व सोशल मिडीया प्रसिध्दी	पुणे महानगरपनालिका सायकल क्लबच्या वेळोवेळी होणा-या उपक्रमांसाठी ऑन लाईन रजिस्ट्रेशन लिंक तयार करणे ,त्याचे नियंत्रण करणे,डाटा एकत्रित करणे, व सोशल मिडीयावर पुणे महानगरपालिकेच्या उपक्रमांना प्रसिध्दी देणे.वेबसाईटवर प्रसिध्द करणे .	सांख्यिकी व संगणकप्रमुख कार्यालय
६	सुरक्षा रक्षक पुरविणे	सायकल रॅलीचे आरंभी ठिकाणी ,मार्गामध्ये व रॅलीचे शेवटी मोठया प्रमाणावर गर्दी असते त्यामुळे सदर गर्दीचे नियंत्रण करणेसाठी संपूर्ण रॅलीचे कालावधीत आवश्यकतेनुसार ,रॅलीचे व्याप्तीनुसार सुरक्षा रक्षक ,सुरक्षा रक्षक वाहनांसह उपस्थित ठेवणे.	मुख्य सुरक्षा अधिकारी
७	पुणे महानगरपालिकेच्या उपक्रमांना प्रसिध्दी देणे.	सदर उपक्रमांअंतर्गत आयोजित विविध रॅलींना, रॅलींपूर्वी व रॅलीनंतर डिजीटल प्रसारमाध्यमांना व वर्तमानपत्रांना फोटो,व्हिडीओ,प्रेसनोट प्रसिध्दीस देणे.	जनता संपर्क अधिकारी
८	पुणे महानगरपालिकेच्या उपक्रमांना प्रसिध्दी देणेसाठी मोबाईल स्पीकरची व्यवस्था करणे.	रॅलीच्या सुरूवातीस वाहनासह मोबाईल स्पीकरची आवश्यकता असून ,रॅलीच्या माध्यमातून जनजागृतीचे संदेश देणे कामाकरीता उत्तम प्रतिची किमान ३०० जणांच्या जनसमुदायास पुरेशी होईल अशी मोबाईल पी.ए.साऊंड सिस्टीम माईकसह उपलब्ध करून देणे. तसेच त्याची देखभाल दुरूस्ती करणे.	मुख्य अभियंता (विदयुत)
९	पुणे महानगरपालिका सायकल क्लबसाठी जागा उपलब्ध करणे.व कामकाजासाठी एक संगणक,प्रिंन्टर, इंटरनेट सुविधेसह उपलब्ध करून देणे.	पुणे महानगरपालिका सायकल क्लबला पत्रव्यवहारासाठी तसेच रॅली संदर्भातील सर्व खात्यांकडून येणारे साहित्य जमा होणार असल्याने , तसेच विविध स्वयंसेवी संस्था व नागरीक हयामध्ये भविष्यात सहभागी होणार असल्याने रॅलीच्या नोंदणीकरीता व इतर चौकशी कामांकरीता नागरीकांशी संबंध येणार असल्यामुळे व पुणे महानगरपालिका सायकल क्लबच्या सभासदांसाठी संपर्क साधण्याचे	उप आयुक्त (मालमत्ता व्यवस्थापन)कार्यालय सांख्यिकी व संगणक प्रमुख कार्यालय उप आयुक्त(भांडार) कार्यालय नगरसचिव कार्यालय

Scanned by CamScanner

		ठिकाण निश्चित करणे आवश्यक असल्यामुळे पुणे महानगरपालिका मुख्य इमारतीमध्ये नगरसचिव कार्यालयाकडील रिकाम्या झालेल्या जागेतील २०० चौ.फुटाची जागा किंवा मुख्य इमारतीमधील अन्य ठिकाणी जागा उपलब्ध करून देणे.	
१०	पुणे महानगरपालिका सायकल क्लबच्या उपक्रमांसाठी आवश्यकतेप्रमाणे सेवक उपलब्ध करणे.	पुणे महानगरपालिका सायकल क्लबचे विविध उपक्रम प्रभावीपणे राबविणेसाठी जागा व संगणक उपलब्ध झाल्यावर कामाची व्याप्ती वाढल्यावर गरजेनुसार सेवकांची आवश्यकता भासणार आहे. त्यासाठी अधिक्षक अभियंता (सायकल विभाग) यांनी आवश्यक तो सेवक उपलब्ध करून देणे.	अधिक्षक अभियंता(सायकल विभाग)
११	पर्यावरणपूरक उपक्रम राबविणे	पर्यावरणपूरक उपक्रम राबविताना विविध विषयांचे वार्षिक दिनाच्या निमित्ताने रॅलींचे आयोजन करणे.उदा.पर्यावरण दिन,वन्यजीव सप्ताह,ध्वनी प्रदूषण,वायू प्रदुषण दिन इ.	मुख्य उदयान अधिक्षक कार्यालय पर्यावरण अधिकारी कार्यालय
१२	उपक्रमासाठी आवश्यक विविध प्रकारची छपाई करणे	पुणे महानगरपालिका सायकल क्लबच्या उपक्रमांसाठी उदा.प्रमाणपत्रे,कार्डस,इतर प्रसिध्दीसाठी वापरायाचे साहित्य यांची छपाई करणे	व्यवस्थापक प्रेस कार्यालय
१३	रॅली मार्गावरील वाहतुकीचे नियोजन	रॅली मार्गावरील वाहतुकीचे नियोजन करणेसाठी अधिक्षक अभियंता (सायकल विभाग) कार्यालयाकडून उप आयुक्त, वाहतुक पुणे शहर यांचेशी पत्रव्यवहार करणे,परवानगी प्राप्त करून घेणे व आवश्यक त्या नियोजनासाठी सहकार्य करणे.	अधिक्षक अभियंता (सायकल विभाग)
१४	पुणे महानगरपालिका सायकल क्लबच्या विविध उपक्रमांसाठी अंदाजपत्रकीय तरतूद करणे.	पुणे महानगरपालिका सायकल क्लब विविध उपक्रम राबविणे हया नावाने अंदाजपत्रकीय तरतूद सायकल विभागाच्या अंतर्गत उपलब्ध करून घेणे.	अधिक्षक अभियंता (सायकल विभाग) मुख्य लेखापाल कार्यालय

Scanned by CamScanner

		सदर तरतूदीचे नियंत्रण अधिक्षक अभियंता (सायकल विभाग) यांनी करावयाचे आहे.	
१५	सर्व उपक्रम यशस्वी राबविणेसाठी समन्वय ठेवणे.	अधिक्षक अभियंता (सायकल विभाग)यांनी सर्व खातेप्रमुख व पुणे महानगरपालिका सायकल क्लब यांचेशी समन्वय ठेवून वरील उपक्रम प्रभावीपणे पार पाडावयाचे आहेत.	अधिक्षक अभियंता (सायकल विभाग) सर्व खातेप्रमुख
१६	सर्व खातेप्रमुख यांनी समन्वय ठेवून सहकार्य करणे.	पुणे महानगरपालिका सायकल क्लब ,अधिक्षक अभियंता (सायकल विभाग) यांचे सहकार्याने स्वयंप्रेरणेने सायकल विषयक उपक्रम राबवित आहेत तसेच त्यांना भविष्यात इतर खात्यांची देखिल आवश्यकतेनुसार मदत लागू शकते याचा विचार करून,पुणे महानगरपालिका सायकल क्लबचे उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्राधान्याने त्यांचेमागणीनुसार सर्व खातेप्रमुख यांनी त्यांना सहकार्य करावयाचे आहे.	अधिक्षक अभियंता (सायकल विभाग) सर्व खातेप्रमुख

शहराचे पर्यावरण राखण्यासाठी ,ध्वनी व वायू प्रदूषण कमी करण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करणे,यामध्ये नागरीकांचा सहभाग वाढविणे या गोष्टी पुणे महानगरपालिकेचा सायकल विभाग व पुणे महानगरपालिका सायकल क्लबच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवून शहरात पर्यावरणपूरक वातावरण निर्माण करणे शक्य होणार आहे. किंबहुना तसे प्रयत्न जाणीवपूर्वक करणे आवश्यक आहे. यास्तव वर नमूद केलेल्या सर्व विभागांनी पुणे महानगरपालिका सायकल क्लबचे उपक्रम यशस्वी करण्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य स्वत:हून करणेबाबत या परिपत्रकान्वये निर्देश देण्यात येत आहेत.

पुणे महानगरपालिकेचे विविध उपक्रम ,योजना यांची जनजागृती करणे , सायकलचा वापर जास्तीत जास्त प्रमाणात वापर करणे व पुणे महानगरपालिका सायकल क्लबच्या उपक्रमात सहभागी होण्यासाठी आपल्या अधिनस्त अधिकारी/सेवक यांना प्रोत्साहित करावे.

(सौरभ राव)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका.

Scanned by CamScanner

प्रत :
मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त(जनरल/विशेष/इस्टेट)
पुणे महानगरपालिका.
यांजकडेस माहितीसाठी..

प्रति
सर्व खातेप्रमुख
सर्व उप आयुक्त (परिमंडळ १ ते ५)
सर्व महापालिका सहा.आयुक्त(क्षेत्रिय कार्यालये)
सर्व विभागप्रमुख.
पुणे महानगरपालिका.
यांजकडेस पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी...

Scanned by CamScanner